| | | |
|---|---|---|
| G | योजनांची माहीती | 1.जननी सुरक्षा योजना_x000D_<br>जननी सुरक्षा योजने अंतर्गत सर्व खेपेच्या अनुसूचित जाती,जमाती व बिपीएल धारक मातांना संस्थेमध्ये प्रसुती झाल्यांस रककक्मकम रु.700/- चा लाभ व सिझर झाल्यास तज्ञांनसाठी रक्कम रु.1500/- लाभ दिला जातो._x000D_<br>तसेच घरी प्रसुती झाल्यांस मातेस रक्कम रु.500/- चा लाभ दिला जातो. |
| | | 2.मातृत्व अनुदान योजना-_x000D_<br>मातृत्व अनुदान योजनेत प्रसुती संस्थेत झाल्यांस तिसरी खेपेपर्यतच्या अनुसूचित जाती,जमाती व बिपीएल धारक मातेला रक्कम रु.400/- चा लाभ दिला जातो_x000D_<br>तसेच घरी प्रसुती झाल्यांस सदर लाभ दिला जात नाही. |
| | | 3.दाई बौठका योजना-_x000D_<br>दाई बौठका हया दर तिन महिन्यांनी घेतली जाते त्यात दाई यांना गरोदर मातेची प्रसुती संस्थेत होणेबाबत मातेला प्रवृत्त करावयांस सांगितले जाते तसेच प्रसुती दरम्यान घ्यावयाच्या आरोग्य विषयक स्वच्छतेची माहिती दिली जाते._x000D_<br>सदर बौठकित दाई यांना रक्कम रु.40/-प्रशिक्षणासाठी दिले जाते व रक्कम रु.10/- चहापाणीसाठी दिले जाते. |
| | | 4.पाडा स्वयंसेवक-_x000D_<br>पाडा स्वयंसेवक यांची कामे पाणी शुध्दीकरण करणे,टिसीएल नमुने घेणे,जलजन्य साथी बाबत संबधीत आरोग्य संस्थेस माहिती देणे असे असुन या बाबत त्यांची मासिक आढावा सभा घेण्यांत येते.व त्यांत त्यांचे कामा बाबत त्यांना मार्गदर्शन करणेत येते. |
| | | 5.पल्स पोलिओ कार्यक्रम_x000D_<br>पल्स पोलिओ कार्यक्रमांतर्गत 0 ते 5 वर्षापर्यतच्या बालकांना एकाच दिवशी पोलिओचा डोस पाजण्यांत येतो<br>एस.टी.बसस्थानक,रेल्वेस्टेशन,बाजारपेठ,विटभटया येथे पोलिओ डोस पाजण्याकरीता बुथ तयार करणेत येते _x000D_<br>तसेच त्या दिवशी पोलिओ डोस पिण्यापासुन वंचित राहिलेल्या बालकांना दुस-या दिवशी गृहभेटी देवून पोलिओ डोस पाजण्यांत येतो. |

| | | |
|---|---|---|
| | | 6.हिवताप नियंत्रण कार्यक्रम_x000D_<br>हिवताप नियंत्रण कार्यक्रामा अंतर्गत कुठलाही ताप हा हिवताप आहे असे गृहीत धरुन रुग्णाचे रक्त नमुने घेवून त्यांना हिवतापाचा गृहीत उपचार दिला जातो. घेतलेल्या रक्तनमुना हा पॉझिटिव्ह आढळल्यांस (पीव्ही) रुग्णांस 14 दिवसाचा उपचार व (पीएफ) रुग्णांस 3 दिवसाचा उपचार दिला जातो._x000D_<br>हिवताप टाळण्यासाठी मच्छर दाणीचा वापर करणे तसेच साठलेल्या पाण्यांत टेमिफॉस औषधाचा वापर करणे बाबत प्रचार व प्रसिध्दी केली जाते._x000D_<br>तसेच डास पौदास केंद्रामध्ये गप्पीमासे सोडले जातात |
| | | 7.कुटूंब कल्याण कार्यक्रम_x000D_<br>कुटूंब कल्याण कार्यक्रमांतर्गत माता व बाल_x000D_ |
| | | 8.माता बाल संगोपन |
| | | 9.कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम_x000D_<br>कुष्ठरोग हा दोन प्रकारचा असतो संसर्गिक,असंर्गिक संसर्गित रोगामध्ये 12 महिने उपचार घ्यावे लागता व असंर्गिक रोगामध्ये 6 महिने उपचार घ्यावा लागतो, कुष्ठरोगाचे लवकर निदान व वेळेवर उपचारामुळे पुढील विकृती टाळता येते._x000D_<br>कुष्ठरोग निर्मलनाकरीता प्रभावी आरोग्य शिक्षण प्राथमिक शाळा ,माध्यमिक शाळा,शासकिय व निमशासकिय आश्रमशाळा ,प्रा.आ.केंद्ारतील कर्मचारी ,आशा,अंगणवाडी कर्मचारी ,महिला बचतगट यांना देण्यांत येते. आरोग्य कर्मचा-या मार्फत घरोघरी सव्र्हेक्षण केले जाते. रुग्णांच्या सहवासातांची तपासणी केली जाते.व या कार्यक्रमामध्ये नविन रुग्ण शोधले जातात व त्यांच्या संबधीत प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत उपचार दिला जातो. |
| | | 10.क्षयरोग निर्मुलन कार्यक्रम_x000D_<br>पंधरा दिवसापेक्क्षा जास्त खोकला ,बारीक ताप,थुकितुन रक्त पडत असेल,भुक मंदावत असेल,फिरताना चक्कर येत असेल अशा रुग्णांचे थुंकि नमुने घेऊन तपासणी करणेत येते._x000D_<br>तसेच थुंकि दुषीत आढळलेल्या रुग्णांना कॅट-1,2,3 या उपचाराखाली आणले जाते._x000D_ |

| | | |
|---|---|---|
| | | क्षयरोग निर्मलनाकरीता गावो गावी प्रसिध्दी व प्रचार करणेत येतो व या बाबत आशा कार्यकत्र्या ,पाडा स्वयंसेवक,अंगणवाडी कार्यकत्र्यांना प्रशिक्षण दिले जाते._x000D_ |
| | | 11.साथरोग नियंत्रण_x000D_<br>साथरोग नियंत्रणाकरीता गांव पातळीवर नियमित पाणी शुध्दीकरण करुन जनतेस पिण्याचे शुध्द पाणीपुरवठा करणे बाबत संबधीत ग्राम पंचायतीच्या सहकार्याने कृती व नियोजन केले जाते._x000D_<br>तसेच पाणी शुध्दीकरणाकरीता पाडा स्वयंसेवक,आाशा यांचेमार्फत घरोघरी मेडीक्लोअरचे वाटप करणेत येते., नियमित पाणी नमुने तपासणी करुन दुषीत आढळून आलेल्या स्त्रोतांचे पुर्नतपासणीसाठी पाठविण्यांत येतात. |
| I | सदरच्या योजनेशी संबंधित शासन निर्णय/परिपत्रके | 2.मातृत्व अनुदान योजना राबविणे बाबत शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग,क्र.माअयो-2008/प्र.क्र.23/कु.क.1/मंत्रालय मुंबई दि.27.2.2009 |
| J | सन 2015-16 मध्ये केलेल्या उल्लेखनीय कामाचे फोटो | --- |
| K | विभागामार्फत सुरू असलेल्या चालु घडामोडी (सर्वे,कार्यशाळा,प्रशिक्षण इ.) | 1.महिलांवरील अत्याचाराच्या विराधात सामुहिक प्रयत्न याचे प्रशिक्षण घेतले._x000D_<br>2.मा (Mother Absolute Affection) चे प्रशिक्षण घेतले |